# भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०३ /२०२५ दि. ०६/०५/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०६/०५/२०२५ ते दि.३१/०५/२०२५ रोजी पर्यंत मे. बुवेरे अॅण्ड असोसिएटस् कंपनी तर्फे एस.टी डेपो ते वजांरपट्टीनाका मुख्य चौकापर्यंत ३५० एम.एम व्यासाची ८५० मी लांब पाण्याची पाईपलाईन खोदकाम करून टाकण्याचे काम करण्यात येणार आहे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) नारपोली, माणकोली, रांजनोली कडुन कल्याणनाका मार्गे वंजापट्टीनाका ब्रिजकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना भिवंडी एस.टी डेपो येथे येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची जड, अवजड वाहने कल्याणनाका येथुन उजवे वळण घेवून रांजनोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील व इतर मध्यम व हलकी वाहने बागे फिरदोस कडुन एस.टी स्टॅण्ड कडे येणाऱ्या वाहिनीवर विरूध्द दिशेने बागे फिरदोसकडे जावून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) नदिनाका व चाविंद्रा रोड कडुन नारपोली, माणकोली, रांजनोली कडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी ब्रिज येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची जड, अवजड वाहने वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी ब्रिज येथुन चाविंद्रा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना दि. ०६/०५/२०२५ ते दि.३१/०५/२०२५ रोजी रात्रौ २२.०० वा ते सकाळी ०६.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण

CamScanner

मा. आयुक्त, भिवंडी-निजामपूरशहर महानगरपालिका, भिवंडी / बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ / भि.शा.ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी / ठाणे.

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :- सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर